# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

प्रेसनोट

## पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून औंध गाव पास केंद्र पूर्ववत सुरू

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे औंध गांव येथील पास केंद्र कोरोना काळापासून बंद होते. तथापि औंध गांव परिसरातील विद्यार्थी, नोकरदार, कामगार, ज्येष्ठ नागरिक, स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून औंध गांव येथील पास केंद्र पूर्ववत सुरू करणेबाबत वारंवार मागणी केली जात होती.

त्यानुसार शुक्रवार, दि. ०९/०८/२०२४ पासून औंध गांव येथील पास केंद्र सुरू करणेत आले आहे. सदरचे पास केंद्र सोमवार ते शनिवार सकाळी ०७.०० ते दुपारी ०२.०० वा. पर्यंत सुरू राहणार आहे. दर रविवारी सदरचे पास केंद्र बंद राहील. तरी औंध गाव परिसरातील विद्यार्थी, नोकरदार, महिला, ज्येष्ठ नागरिक, महिला प्रवाशी वर्ग यांनी या पास केंद्राच्या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिवहन महामंडळाकडून करणेत येत आहे.

**अधिक महितीसाठी दूरध्वनी संपर्क क्र. ०२०-२४५४५४५४**

sd/-
**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि. ०९/०८/२०२४

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-
**कामगार व जनता संपर्क अधिकारी**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---